साप्ताहिक
# परळी परिसर
* परळी वैजनाथ * सोमवार, दि. २० जानेवारी २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## मला ठरऊन टार्गेट केले जात आहे, पण मी अभिमन्यू नाही,मी अर्जुन आहे-ना.धनंजय मुंडे

### ना.धनंजय मुंडेंचे शिर्डीत आक्रमक भाषण




शिर्डी (बातमीदार): - मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून अजितदादांच्या प्रत्येक निर्णयात ठामपणे सोबत उभा राहिलो. पक्षाच्या वाईट काळात वेगवेगळी आंदोलने, यात्रा आदींच्या माध्यमातून अख्खा महाराष्ट्र पिंजून काढला. मात्र आता बीड जिल्ह्यातील एका दुर्दैवी हत्या प्रकरणा आडून मला जाणीवपूर्वक ठरवून टार्गेट केले जात आहे. महायुतीतील नेत्यांकडूनच मला लक्ष्य केले जात आहे, याचेच जास्त वाईट वाटत आहे. पक्षातील काही लोक देखील दादांच्या कानाला लागून चुकीची माहिती देऊन दिशाभूल करत आहेत. मात्र माझी भूमिका व वस्तुस्थितीची जाणीव असल्याने या कठीण काळातही पक्ष म्हणून दादा माझ्या पाठीशी उभे आहेत. आज कुणी निराधार व बिनबुडाचे कितीही आरोप करून मला अडकवण्याचा, माझा अभिमन्यु करण्याचा प्रयत्न केला तरीही उपयोग होणार नाही, कारण मी अभिमन्यु नाही, मी अर्जुन आहे! अजितदादांनी आता बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले आहे, याचा आनंद असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे.

शिर्डी येथील पक्षाच्या अधिवेशनात रविवारी (दि.१९) ना.मुंडे बोलत होते. ते पुढे म्हणाले, बीड जिल्ह्यात डिसेंबर महिन्यात झालेली स्व.संतोष देशमुख यांची हत्या ही अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक होती. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फासावरच लटकवले पाहिजे, हे माझे पहिल्या दिवसापासून स्पष्ट मत आहे. गुन्हेगारी ही एक नीच वृत्ती आहे, त्याला जात धर्म नसतो. मात्र या घटनेच्या आडून जात म्हणून एका समाजाला जाणीवपूर्वक गुन्हेगार ठरवले जात आहे. सातत्याने आमची मीडिया ट्रायल केली जात आहे, याबद्दल धनंजय मुंडे यांनी खंत व्यक्त केली.

सामाजिक न्याय मंत्री म्हणून मी चांगले काम करून दाखवले. गाव - वस्त्यांची जाती वाचक नावे बदलणे, ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ यांसारखे अनेक क्रांतिकारी निर्णय त्याकाळात घेतले.

११ हजार कोटी रुपये पीकविमा एका वर्षात मिळवून देणारा कृषिमंत्री मी, मात्र त्यावरूनही टीका झाली. मात्र अर्धवट माहिती देऊन बदनामी करणारे लोक यावर बोलत नाहीत, असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट करून ते पुढे म्हणाले, मी सतत काम करणारा एक कार्यकर्ता आहे, नेता फक्त नावाला आहे. माझ्यातला कार्यकर्ता कधीच मरणार नाही. मी एक निष्ठावान कार्यकर्ता आहे, पक्ष नेतृत्वाने पाँडिचेरी मध्ये जाऊन पक्ष विस्ताराचे काम कर म्हंटले तर तिथे जाऊन मी काम करेल. पक्षाला सुद्धा कार्यकर्ताभिमुख व्हावे लागेल. कार्यकर्त्याला ताकत देताना संपूर्ण विश्वास देखील ठेवणे आवश्यक आहे, तेव्हाच पक्ष संघटना मजबूत होईल. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये पक्षाचा कार्यकर्ता कुठेही कमी पडणार नाही, असा विश्वास धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. ***

## उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्याकडे बीडच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी

### राज्यातील पालकमंत्री पदाची घोषणा

मुंबई (बातमीदार):- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परदेश दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी रेंगाळत पडलेल्या पालकमंत्रीपदाचे वाटप केले असून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना बीडच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली आहे तर ना.पंकजाताई मुंडे जालन्याच्या पालकमंत्री राहतील.

श्री पवार बीडबरोबरच पुण्याचेही पालकमंत्री राहणार असून चंद्रकांत पाटील यांना सांगलीची जबाबदारी देण्यात आली आहे. नागपूर, अमरवती चंद्रशेखर बावनकुळेंकडे राहणार असून हसन मुश्रीफ वाशिमचे पालकमंत्री राहतील.

जालन्याचे पालकमंत्रीपद पंकजाताई मुंडे, नांदेडचे अतुल सावे, लातूरचे शिवराजे भोसले, हिंगोलीचे नरहरी



झिरवाळ, संभाजीनगरचे संजय शिरसाट, परभणीच्या मेघनाताई बोर्डीकर, धाराशिवचे प्रताप सरनाईक पालकमंत्री राहतील. बीड जिल्हा गेल्या काही दिवसापासून वादग्रस्त बनलेला आहे. या जिल्ह्याचे पालकमंत्री मुंडे बंधू भगिनींकडे न देता देवेंद्र फडणवीस अथवा अजित पवार यांना दिले पाहिजे, अशी मागणी होती. त्यामुळे श्री पवार यांना बीडच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे राजकीय नेत्यांनी या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

दरम्यान, प्रजासत्ताक दिनानिमित्त येत्या २६ जानेवारीला बीडचे मुख्य शासकीय ध्वजारोहण क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार आहे. सकाळी ९.१५ मिनीटांनी ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय कार्यक्रम होणार आहे अशी माहिती राजशिष्टाचार विभागामार्फत देण्यात आली. ***

## अजितदादांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्याचा पुण्यासारखा विकास होईल - ना.मुंडे

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची पुण्यासह बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी नियुक्ती करण्यात आली असून या नियुक्तीचे राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी स्वागत करत अजित दादांचे अभिनंदन केले असून अजित दादांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्याचा पुणे जिल्ह्याप्रमाणे विकास व्हावा अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे. बीड जिल्ह्यात सध्या सुरू असलेली सामाजिक व राजकीय परिस्थिती पाहता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे आपणच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मला न करता उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारावे अशी विनंती केली होती, असेही धनंजय मुंडे यांनी केलेल्या ट्विटमध्ये म्हटले आहे. तसेच सद्यस्थितीमध्ये मला कोणत्याही जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी दिली जाऊ नये, याबाबतही आपण मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना विनंती केली होती, त्यांनी ती मान्य केल्याबद्दल त्यांचे आभारही धनंजय मुंडे यांनी मानले असून, आपल्यावर देण्यात आलेल्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाची जबाबदारी आपण प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी प्रयत्नशील राहू, असेही धनंजय मुंडे यांनी आपल्या ट्विट मध्ये म्हटले आहे.

## बीड जिल्ह्यातील १६० जणांचे शस्त्र परवाने रद्द

बीड (बातमीदार):- जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील सुमारे १६० जणांचे शस्त्र परवाने रद्द व निलंबित केले आहेत. केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर विधानसभेच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात भाजपचे आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी बीड जिल्ह्यातील शस्त्र परवान्याचा मुद्दा उपस्थित केला होता. जिल्ह्यात बाराशेवर शस्त्र परवाने असून काही राजकीय नेत्यांच्या शिफारशीवरून अनेकजणांना परवाने दिल्याचा आरोपही त्यांनी केला होता. याची चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली होती.*

## राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४ साठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

मुंबई, (जि.मा.का.):- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/ छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याची शेवटची तारीख ३१ जानेवारी, २०२५ अशी आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने dgipr.maharashtra.gov.in व www. maharshtra. gov.in तसेच https:// mahasamvad.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. **

## ना.धनंजय मुंडेंचा परळीत जनता संवाद, जगमित्र कार्यालय गजबजले

परळी वैद्यनाथ (बातमीदार):- नियमित प्रमाणे परळीत आल्यानंतर आज राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी परळी येथील आपल्या जगमित्र या कार्यालयामध्ये बसून मतदारसंघातून व मतदारसंघ बाहेरून आलेल्या नागरिक कार्यकर्ते तसेच पदाधिकारी यांच्याशी संवाद साधत त्यांची कामे अडचणी समजून घेतल्या तसेच ती मार्गी लावण्याबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना देत संबंधितांची कामे मार्गी लावली.

जागच्याजागीच काम मार्गी लावण्याच्या शैलीमुळे धनंजय मुंडे यांच्या जनता संवाद उपक्रमास नेहमीच गजबजलेली गर्दी पाहायला मिळते. आजही धनंजय मुंडे जगमित्र कार्यालयात दाखल झाल्यानंतर पदाधिकारी कार्यकर्ते



त्याचबरोबर परळी व परळी बाहेरील नागरिकांनी जगमित्र हे धनंजय मुंडे यांचे कार्यालय गजबजलेले पाहायला मिळाले.

मंत्री धनंजय मुंडे हे परळीत असल्यानंतर नियमित प्रभू वैद्यनाथांच्या दर्शनाला जातात. आजही घराबाहेर पडतात त्यांनी सर्वप्रथम बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथांचे मनोभावे दर्शन करून विधिवत पूजन केले व त्यानंतर ते जनता संवाद उपक्रमासाठी त्यांच्या जगमित्र या कार्यालयात दाखल झाले.*

# दरवर्षी एसटी महामंडळ स्वमालकीच्या ५ हजार लालपरी बसेस खरेदी करणार - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई, (जि.मा.का.):- एस. टी महामंडळ दरवर्षी स्वमालकीच्या ५ हजार साध्या लालपरी बसेस खरेदी करणार आहे. यासाठी महामंडळ अंतर्गत पंचवार्षिक नियोजन करण्यात येणार आहे, तसेच महामंडळात यापुढे कुठल्याही पद्धतीने भाडेतत्त्वावर बसेस न घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला.

परिवहन आयुक्त कार्यालयात एसटी महामंडळ कामकाज आढावा बैठक परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. बैठकीस एस टी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

परिवहन मंत्री श्री. सरनाईक म्हणाले, नवीन बस खरेदीचा करताना पुढील पाच वर्षात स्क्रॅपिंग (प्रवासी सेवेतून बाद होणाऱ्या)होणाऱ्या बसेसचा विचार करण्यात यावा. याबाबत सर्वांगीण अभ्यास करून पंचवार्षिक योजना आणावी. एस. टी. महामंडळात इलेक्ट्रिक बसेस घेण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक आगारामध्ये चार्जिंग स्टेशन प्राधान्याने उभारण्यात यावे. महामंडळाने उत्पन्न वाढीसाठी पूरक योजना आणाव्यात. कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत देण्याची काळजी घेण्यात यावी. पगाराला कुठल्याही परिस्थितीत उशीर होता कामा नये. शासनाकडून महामंडळाला मिळणारा निधी आगाऊ स्वरूपात मिळण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचनाही दिल्या.

परिवहन मंत्री श्री. सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाने नवीन जाहिरात धोरण आणावे. नवीन येणाऱ्या बसेसवर दोन्ही बाजूला आणि मागील बाजूस अशा तीनही बाजूला डिजिटल जाहिरातीची व्यवस्था असावी. जाहिरात धोरणासाठी अन्य बाबी तपासून यामधून मिळणारे उत्पन्न १०० कोटीपर्यंत आणण्याचे उद्दिष्टही ठेवण्यात यावे. महामंडळाच्या बसेसला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या रस्त्यांवर टोल माफी मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. तसेच डिझेलवरील व्हॅटमध्ये सवलत देण्यासाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. एस टी महामंडळाच्या प्रत्येक डेपोमध्ये डिझेल पंप आहे. या पंपाचा व्यावसायिक दृष्टिकोनातून उपयोगी ठरतील असे डिझेल पंप सुरु करून उत्पन्न वाढीसाठी पर्याय निर्माण करण्यात यावा. याबाबत इंधन कंपन्यांची करार करावा, अशा सूचनाही परिवहन मंत्री श्री सरनाईक यांनी दिल्या.*

# पीएचडी पदवी प्राप्त डॉ.ऋषिकेश यांनी समाजासमोर शैक्षणिक आदर्श निर्माण केला - डॉ.राम पेंटेवार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- डॉ ऋषिकेश सुरेश अंबेकर यांनी अभियांत्रिकीच्या धातुकर्म आणि साहित्य या विषयात Ph.D. पदवी प्राप्त केल्याबद्दल पद्मसाळी समाज व पेंटेवार कुटुंबातर्फे हृदय सत्कार करण्यात आला.

परभणी येथील रहिवासी व परळी वैजनाथ येथील नामवंत व्यापारी कै. शंकरराव पेंटेवार यांचे नातजावई डॉ ऋषिकेश सुरेश अंबेकर यांनी टोपोलॉजिकल-इंजिनियर केलेल्या 3D मुद्रित आर्किटेक्चर्सचे यांत्रिक गुणधर्म (Mechanical Properties of Topologically - Engineered 3D Printed Architectures) या विषयात जगातील नामांकित असलेले विद्यापीठ IIT खरगपूर येथून Ph.D. पदवी प्राप्त केली आहे. अत्यंत कठीण असलेल्या या यशाबद्दल परळी येथे डॉ ऋषिकेश यांचा हृदय सत्कार परळी येथील पद्मसाळी समाज व नामवंत कापड व्यापारी पेंटेवार कुटुंबातर्फे रविवार दि १२ जानेवारी रोजी ठेवण्यात आला होता. यावेळी पद्मसाळी समाजाचे युवक जिल्हाध्यक्ष डॉ राम पेंटेवार यांनी बोलताना सांगितले की, पद्मसाळी समाज हा मूळचा व्यापारी समाज परंतु आता नवीन पिढी व्यापारा सोबतच शिक्षण क्षेत्रातही आघाडीवर आहे. समाजातील अनेक



युवक अतिउच्च शिक्षणातही आपले नाव अग्रभागी ठेवत आहेत. या शिक्षणाचा आपल्या समाजाबरोबरच भारताच्या प्रगतीत वाटा उचलत आहेत. डॉ ऋषिकेश अंबेकर यांनी नामांकित खरगपूर IIT येथून मिळवलेली Ph.D. ही समाजातील अनेक युवकांना प्रेरणादायी ठरेल. डॉ ऋषिकेश हे धातुकर्म आणि साहित्य अभियांत्रिकी (Metallurgical & Materials Engineering) M. Tech. आहेत तसेच त्यांचे अनेक नामांकित विज्ञान नियतकालिकात लेख छापून आलेले आहेत. नामांकित खरगपूर विद्यापीठातून पीएचडी पदवी प्राप्त डॉ. ऋषिकेश यांनी समाजासमोर शैक्षणिक आदर्श निर्माण केला आहे.

डॉ ऋषिकेश यांच्या या अत्युच्च यशाबद्दल सत्कार कार्यक्रमास नगरसेवक शंकर आडेपवार, प्रकाश पेंटेवार, बाळासेठ शंकुरवार, माऊली आघाव, शामराव आडेपवार, वैजनाथ तम्मलवार, बालाजी पालाकूडतेवार, रमेश पालाकूडतेवार, गोपीदादा शंकूरवार, वसंत पेंटेवार, नितीन आडेपवार, वैष्णवी अंबेकर, गायत्री पेंटेवार, पौर्णिमा पेंटेवार, सौ निता पेंटेवार, लक्ष्मी आडेपवार, नीलम शंकूरवार, सारिका आडेपवार, अंजली आडेपवार, विकास आडेपवार, सुरज गुट्टे, विनोद चव्हाण, संदीप काकडे यांच्यासह पद्मसाळी समाजबांधव व मित्रपरिवार उपस्थित होते. यावेळी खोपोली येथील उद्योजक शिवाजी पालाकुडतेवार यांनीही दूरध्वनीद्वारे डॉ ऋषिकेश अंबेकर यांना शुभेच्छा दिल्या व मुंबई पद्मसाळी समाजही लवकरच डॉ ऋषिकेश यांचा सत्कार करणार असल्याचे जाहीर केले.*

# शक्तीपीठ महामार्गाचे काम सुरु करावे-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई, (जि.मा.का.):- राज्यातील दळणवळण सुविधा तसेच व्यावसायिक संधी त्याचसोबत पर्यटनाला व्यापक प्रमाणात गती देणा-या शासनाच्या महत्वकांक्षी शक्तीपीठ महामार्गाच्या कामाचे नियोजन सर्वांना विश्वासात घेऊन तत्परतेने सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधितांना येथे दिले.

सह्याद्री अतिथिगृह येथे आगामी शंभर दिवसात सार्वजनिक बांधकाम विभागाने करावयाच्या कामकाजाचा आढावा मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी घेतला. त्यावेळी त्यांनी संबंधितांना निर्देशित केले. बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, श्रीमती मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, यांच्यासह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, सचिव सदाशिव साळुंखे, सचिव ए.दशपुते, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व्यवस्थापक अनिल गायकवाड यांच्या सह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी राज्यातील महामार्गाची उभारणी तसेच रस्त्यांचे जाळे दर्जेदार आणि अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने नियोजन करण्याचे सूचित करुन सांगितले की राज्यातील धार्मिक स्थळांना जोडणारा आणि पर्यटन उद्योग व्यवसायाला प्रोत्साहन देणारा शक्तीपीठ महामार्गाची उभारणी ही दर्जेदार आणि गतीमानतेने करावयची असून त्यासाठीच्या प्रक्रीया सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी दिले. समृद्धी महामार्गाचे उर्वरित अंतिम टप्प्याचे आमणे पर्यंतचे ७६ कि.मी. लांबीचे काम तत्परतेने पूर्ण करुन फेब्रुवारी पर्यंत हा महामार्ग पूर्णपणे खुला करावा. तसेच यावर्षी समृद्धी महामार्गाचे कर्ज रोखे प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. प्रवाश्यांना उपयुक्त ठरणा-या मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील १३.३० कि.मी. मिसिंग लिंकचे काम ही गतीने पूर्णत्वास न्यावे. त्याचप्रमाणे नाशिक मुंबई या महत्वाच्या राष्ट्रीय महामार्गाचे सुधारणा करण्याचे काम ही तातडीने पूर्ण करावे. तसेच मंत्रालय परिसरात नविन सात मजली इमारतीची उभारणी कामाची सुरवात येत्या शंभर दिवसात करण्याचे सूचित केले. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कामांची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी संबंधितांकडून योग्यरित्या पार पाडल्या जाणे आवश्यक असून त्याचे नियंत्रण करणारी यंत्रणा विभागाने कार्यान्वित करावी. विभागाच्या आर्थिक सक्षमतेसाठी नियोजन विभागाच्या निर्देशानुसार आर्थिक प्रारुप तयार करावे. त्याचप्रमाणे रस्त्यांच्या निर्मितीसाठी भूसंपादन प्रक्रिया शासनाने करुन रस्त्याचे काम बीओटी तत्वार करण्याचे धोरण स्विकारावे. विविध विभागांच्या बांधकामां संदर्भात केंद्रीय कार्यपद्धती अंमलात आणणे गरजेचे आहे. त्यासाठी बांधकाम विभागातच संबंधित विभागांच्या बांधकामासाठीचा स्वतंत्र कक्ष तयार करण्यात येईल. रस्त्यांच्या दुर्तफा वृक्ष लागवड करताना भविष्यातील रस्ता विस्तारी करणाची निकड लक्षात घेऊन वृक्षसंगोपन करणात यावे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन दर्जेदार आणि गतिमान कामे करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश ही मुख्यमंत्र्यांनी यावेळी संबंधितांना दिले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विभागामार्फत गुणवत्तापूर्ण आणि गतीमानतेने काम करण्यास प्राधान्य देण्यात येणार असून विभागाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि कालमर्यादा प्रामुख्याने पाळण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच महामार्गावर प्रवाश्यांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध असण्यावर प्राधान्याने महिला प्रवाश्यांसाठी प्रसाधन गृहाची सुविधा उपलब्ध करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगितले. विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती म्हैसकर यांनी विभागाच्या आगामी शंभर दिवसांच्या नियोजनाबाबत माहिती देताना कार्यक्षमता, गुणवत्ता,पारदर्शकता याला प्राधान्य देत विभागाच्या माध्यमातून येत्या शंभर दिवसांत विविधांगी महत्व पूर्ण प्रकल्प पूर्णत्वास नेण्यात येणार असून विभागाच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने राबवण्यात येणा-या कामांची सविस्तर माहिती यावेळी दिली. ***



संपादकीय...

# नवे पालकमंत्री...!

**✻ सुविचार ✻**
**चांगले कर्म करणारी व्यक्ती ही तुकोबांच्या गाथेप्रमाणे असते, कुणी कितीही बुडविण्याचा प्रयत्न केला तरी तरुन जाते.!**

राजकारणासह विविध क्षेत्रात माध्यमांवर सतत चर्चेत रहाणारा जिल्हा म्हणून आता बीडची ओळख झाली आहे. मराठवाड्यातील विविधदृष्ट्या महत्वाचा असलेला हा जिल्हा गेल्या दीड पावणेदोन महिन्यांपासून सबंध महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर गाजतो आहे. इथली गुन्हेगारी, बेकायदा धंदे, बोगस पीकविमा, वाळू उपसा, राखेची वाहतूक, शस्त्र परवाने, फसवणूक अशी इथली कितीतरी प्रकरणे चव्हाट्यावर आल्याने बीड जिल्ह्याची मोठी बदनामी झाली आहे व सध्याही ती सुरू आहे. केज तालुक्यातील मस्साजोगचे तरुण सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे झालेली हत्या बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील तमाम सर्वसामान्य जनतेला मोठी चीड आणणारी व संतप्त करणारी ठरली. या हत्येने सबंध बीड जिल्हाच नव्हे तर महाराष्ट्र ढवळून निघाला. राज्यात महायुतीचे नवे सरकार सत्तारुढ झाल्यानंतर काहीच दिवसात झालेल्या या घटनेने राजयातील राजकारणही ढवळून निघाले. या सरकारचे नागपूरचे पहिलेच अधिवेशन मस्साजोगची घटना घडल्यानंतर सुरू झाले. या अधिवेशनात सर्वाधिक चर्चा झाली ती बीडच्या गुन्हेगारीची व सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येची. या चर्चेमुळे सर्वांचेच लक्ष बीड जिल्ह्याकडे वळले. या हत्येचा कसून तपास करावा. सर्व दोषींना शोधून त्यांना फासावर द्यावे, या घटनेचे सूत्रधार असलेल्यांवरही कारवाई व्हावी अशा कितीतरी मागण्या पुढे आल्या. या मागण्यांसाठी सकल मराठा समाजासह विविध पक्षीय जनआक्रोश मोर्चे राज्यात विविध ठिकाणी निघाले व सध्याही ते सुरू आहेतच. या मोर्चा बरोबरच रास्ता रोको, निदर्शने इतर विविध मार्गाने आंदोलन होत आहेत. दरम्यान घटनेची तीव्रता व गांभीर्य ओळखून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या हत्त्येची व त्याला जोडून झालेल्या खंडणी प्रकरणाची न्यायालयीन, सीआयडी, एसआयअी मार्फत चौकशी करण्याची व या प्रकरणी दोषी असणाऱ्या सर्वांवर कठोर कारवाई करण्याची घोषणा विधी मंडळाच्या नागपूर अधिवेशनात केली. या घटनांमुळे बीड जिल्ह्याच्या कायदा व सुव्यवस्थेची लक्तरे चव्हाट्यावर आली. राजकारण्यांच्या हातचे बाहुले बनलेल्या पोलिस प्रशासनाच्या आब्रुचे धिंडवडे निघाले. या प्रकरणी जिल्हा पोलिस प्रमुख अविनाश बारगळ यांची तडखाफडखी बदली झाली. शिवाय इतर अनेक अधिकाऱ्यांचीही बदली झाली, काहींवर कारवाई झाली. या घटनेने काही राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते यांच्यावर आरोप सुरू झाले. इथल्या मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणीही केली जाऊ लागली. त्या बरोबरच आम्हाला 'हे' पालकमंत्री नकोत म्हणून मागण्या होऊ लागल्या. सरपंच संतोष देशमुख व खंडणी प्रकरणाचा तपास अधिक पारदर्शक व्हावा म्हणूनही या मागण्या केल्या गेल्या. या प्रकरणाच्या आंदोलनादरम्यान मुख्यमत्री, उपमुख्यमंत्र्यांनी बीडचे पालकमंत्री व्हावे म्हणून मागणीने जोर घेतला. बीडच्या गुन्हेगारीला बिहारची व वासेपूरची उपमाही दिली जाऊ लागली. खून व खंडणीच्या घटने आडून काही मंडळी राजकारण करत आहे. जिल्ह्याची बदनामी करत आहे अशी प्रतिक्रिया काही नेत्यांनी जिल्ह्यातील नेत्यांच्या बाबतीत केली परंतु या सगळ्या घटनांकडे दूर्लक्ष का केले असा सवाल प्रतिक्रिया देणाऱ्यांच्या बाबतीत अनेकांनी उपस्थित केला.

दरम्यान, राज्यात विधानसभेच्या निवडणुका वीस नोव्हेंबरला होऊनही व महायुतीला प्रचंड बहुमत मिळूनही मुख्यमंत्रीपदाचा नेता ठरवण्यापासून ते मंत्रिमंडळ, मंत्रिमंडळाचा विस्तार, खातेवाटप व पालकमंत्री यांची निवड. इथपर्यंतच्या प्रवासाची गाडी भलतीच सावकाश धावली. तब्बल दोन महिन्यानंतर पालकमंत्री जाहीर झाले. पालकमंत्र्यांच्या निवडीस विलंब होत असल्याने राज्यात प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन समित्यांचे (डीपीसी) नियोजन बिघडले शिवाय इतर अनेक प्रश्न लटकले. पालकमंत्र्यांची घोषणा करण्याची मागणीही होऊ लागली. बीड जिल्ह्यातील मंत्र्याऐवजी उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजितदादा पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाले. यामुळे याची पुन्हा राज्यभर चर्चा झाली. दरम्यान, यावेळी पालकमंत्री या जिल्ह्याचे न करता पर जिल्ह्याचे करावेत अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली होती. त्यामुळे बऱ्याच जिल्ह्यांना बाहेरचे पालकमंत्री मिळाले आहेत. श्री पवार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाले आहेत. त्यांचे स्वागत सत्ताधाऱ्यांसह विरोधी पक्षातील नेत्यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक परिस्थिती पहाता जिल्ह्यात महायुतीच्या सरकार मधील दोन मंत्री असून जिल्ह्याबाहेरचे पालकमंत्री दिले गेले आहेत. यापूर्वी अतुल सावे, बबनराव पाचपुते, शंकरराव कोल्हे, बाबासाहेब भोसले या बाहेरच्या मंत्र्यांनी जिल्ह्याचे पालक मंत्रीपद सांभाळलेलं आहे तर राज्यात उपमुख्यमंत्री पदावर असलेल्या लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्यानंतर अजित पवार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाले आहेत. यापूर्वी धनंजय मुंडे, पंकजाताई मुंडे, जयदत्त क्षीरसागर, विमलताई मुंदडा या जिल्ह्यातील आमदार व मंत्र्यांनी जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भुषवलेले आहे.

श्री पवार यांना बीड जिल्ह्याचा चांगला अभ्यास आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विकासाच्या प्रश्नाबरोबरच जिल्ह्यात निर्माण झालेल्या कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळणे, इथली गुन्हेगारी मोडीत काढणे, गुंडगिरी, राजकारण्यांच्या हातचे बाहुले झालेले प्रशासनाला सरळ करणे, भ्रष्टाचार, पीकविमा घोटाळा, वाळू व राखेची तस्करी, प्रशासनातील वाढता भ्रष्टाचार, बिंदूनामावली, विकासकामांचा निकृष्ट दर्जा, जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिकेत सुरू असलेली मनमानी, भ्रष्टाचार सर्वसामान्यांची होणारी पिळवूणक असे कितीतरी प्रश्न सोडवण्याचे आव्हान पालकमंत्री म्हणून श्री पवार यांच्या पुढे असणार आहेत. ते ही सर्व आव्हाने, प्रश्न कशी सोडवतात याकडे जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे. ✻✻✻

# स्वराज्य निर्मितीची मशाल : राष्ट्रमाता जिजाऊ...

ह्याच जिजाऊ ज्यांच्या
प्ररणे उजळे स्वराज्य ज्योती ।
ह्याच जिजाऊ ज्यांनी घडविले
रयत आणि दोन छत्रपती ।।

विखुरलेल्या समाज बांधवांना एकतेच्या सूत्रात गुंपून जगातले मोठे जनअंदोलन उभा करणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या व्यक्तीमत्वात कर्तृत्व, धुरंधर, लढाऊ, न्यायी, निर्भीड इत्यादींचा ठसा प्रकर्षाने दिसून येतो. प्रभावी व रूबाबदार व्यक्तीमत्वाच्या जोडीला करारीपणा, प्रचंड आत्मविश्वास,ममता, वात्सल्य, करूणा, मुत्सदधीपणा, निर्णयशक्ती, संयम, तिव्र आत्मसन्मान, तल्लख बुधिमत्ता, दृढनिश्चय, विनयशिलता, सौदर्य, संघटन कौशल्य, महत्वकांक्षा, त्याग, निस्वार्थीवृत्ती अशा विविध गुणांचा संगम होता.

जिजाउंचा जन्म १२ जानेवारी १५९८ विदर्भातील बुलढाणा जिल्यातील सिंदखेड राजा येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव लखुजी राजे आणि आईचे नाव म्हाळसाबाई होते. इ.स. १६१५ च्या सुमारास त्यांचा विवाह शहाजी राजे यांच्याशी झाला. १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरीवर शिवराय या थोर पुत्रास जन्म दिला. राजमाता, राष्ट्रमाता जिजाउचा जीवनकाळ सन १२ जानेवारी १५९८ ते १७ जुन १६७४ होता. जिजाउ-शहाजींराजेंचा काळ धाम धुर्मीचा होता. महाराष्ट्रावर अस्मानी आणि सुलतानी संकट घोंगावत होते. महाराष्ट्र अदीलशाही, कुतुबशाही, निजामशाही अशा अन्यायी आणि जूल्मी 'शाहि' राजकारणात भरडून निघत होता. या शाहीमध्ये आप-आपसात लढाया होत. विजय कोणाचाही झाला तरी मरणारे मात्र मराठे असायचे. या आणि अशा मोगल सत्तांनी महाराष्ट्राची रयत उध्वस्त होत होती. स्त्रीयां सुरक्षीत नव्हत्या. या अन्याय, अत्याचारांचा प्रतिकार कोणीच करत नव्हते. सारी रयत भयभीत झाली होती. अशा जूलमी अत्याचाराचा नि:पात करण्यासाठी जिजाऊ आणि शहाजी राजे शिवबांच्या माध्यमातून सज्ज झाले होते.

शहाजीराजे यांच्या सहकार्याने
जिजाउंनी शिवबा वर
कोणते संस्कार दिले ?
तोडून श्रृंखला, मुक्तकर मानवाला ।
जिजाऊ प्रेरणा, देई शिवबाला ।।

छत्रपती शिवरायांवरील संस्कार शहाजीराजे आणि जिजाउंनी शिवराय अनेक भाषेत पारंगत होण्यासाठी अनेक शिक्षकांची नेमणूक केली होती. लष्करी शिक्षणात तरबेज होण्यासाठी स्वत: जिजाऊंनी मोठी मेहनत घेतली तसेच बाजी पासालकर सारखे अनेक लष्करी शिक्षक नेमले. शिवराय अनेक विद्यांमध्ये तरबेज झाले.

जिजाऊंच्या संस्काराने शिवरायांमध्ये आपल्या विचारावर दृढ विश्वास अथक प्रयत्नांची तयारी, क्रांतीकारक विचारांची कास, असामान्य धैर्य सत्याची चाड, उच्च कोटीची नितीमत्ता साकारली.

जिजाऊंनी बाल शिवबाला आत्मविश्वास आणि प्रयत्नवादाच बाळकडू



दिल. इंगीत विद्या मध्ये बाल शिवाजीला परांगत केले. छत्रपती शिवरायांच्या सैन्यात ३५ % पासून आरमार, घोडदळ यामध्ये ७० % ते ८० % मुस्लीम सैनिक होते. एका मुस्लीमाने छत्रपती शिवरायांशी आणि स्वराज्यांशी बईमानी केली नाही. हा वास्तव इतिहास आहे. इ.स. १६३० मध्ये अदिलशाहाचा सरदार मनुवादी वृत्ती आणि अंधश्रधा पसरवून पूणे उध्वस्त केले होते. ते पूणे विश्वास आणि आत्मविश्वासाच्या जोरावर इ.स. १६३६ मध्ये वसवले, पूणे या शहराची उभारणी केली. १० नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडाच्या पायथ्याशी छत्रपती शिवाजी महाराज आणि अफजलखान भेटीचा प्रसंगी एक कनखर धाडसी आणि प्रचंड आत्मविश्वास देणारी माता दिसून येते.

इ.स. १६६० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची सिद्दीजोहारच्या पन्हाळगडाच्या वेड्यातून मुक्तता करणे असेल. इ.सन. १६६३ साली पुन्यात केलेली शाहिस्तेखानाची फजीती असेल १५ जून १६६५ ला जयासिंग आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यातील पुरंदरचा तह असेल. इ.सन.१६६६ साली आग्रा या ठिकाणी औरंगजेबाच्या तावडीतून छत्रपती शिवरायांची सुटका असेल ६ जून १६७४ शिवराज्याभिषेक असेल अशा अनेक प्रसंगी एक सावध मुत्सद्धि, नियोजन करणारी, प्रचंड आत्मविश्वास देणारी कणखर अमलबजावणी करणारी माता म्हणून राजमाता राष्ट्रमाता जिजाउंचे शिवरायांना, स्वराज्याला, रयतेला मोठे योगदान लाभले आहे. राजमाता जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर छत्रपती संभाजी महाराजही सर्व क्षेत्रात, सर्व गुणसंपन्न, सुसंस्कारीत केले. मानवतेचा सर्वोच्च अविष्कार स्वराज्यात पहायला मिळतो. झोपलेल्यांना उठवले, उठलेल्यांना चालायला लावणे, चालणरांना पळायला लावले, सामान्य माणसांकडून असामान्य कार्य करुन घेतले. प्रत्येक मावळयात विश्वास आणि आत्मविश्वास निर्माण केला. मावळा म्हणजे आठरा पगड जात आणि मुस्लीम यातील सैनिक म्हणजे मावळा होय. शिवरायांच्या हातात तलवार भवानीने नाही तर जिजाऊनी दिली. शिवरायांचे गुरु राजमाता जिजाऊं, शहाजी राजे, संत तुकाराम महाराज, बाबा याकुत, मौनिबाबा हे होते.

स्वराज्यात जात-पात मनुवाद गाडणारे, मानवतेचा आधार आणि दुर्जनतेचा कर्दणकाळ ठरणारे, शूद्र्या स्त्रीचा सुध्दा सन्मान करणारी जगातली पहिली शासन व्यवस्था म्हणजे रयतेचे कल्याण्कारी स्वराज होय. आशा स्वराज्याच्या निर्मितीच्या मशालं होत्या राजमाता राष्ट्रमाता जिजाऊं. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि रयत यावर यथायोग्य संस्कार करुन जगाने दखल घ्यावी असे स्वराज्य निर्माण केले. समारोप : आजच्या युवक-युवतीनी यातून योग्य बोध घेवून सामाजिक सलोखा, शेती व शेतकऱ्यांचा सन्मान, व्यसनमुक्त तरुण, करोना सारख्या महामारी मुक्त भारत, जागतिक दर्जाचा समाज इत्यादीसाठी सर्व समाज बांधवांचे योगदान महत्वाचे आहे. अशा उतुंग व्यक्तीमत्वाच्या राजमाता राष्ट्रमाता जिजाऊंच्या कार्याला त्रिवार अभिवादन. जिजाऊ उपास-तापास, कर्मकांड करणाऱ्या दैववादी नव्हत्या तर विज्ञानवादी, प्रयत्नवादी होत्या. स्वराज्यात अनेक किल्ले बांधले पण त्याची वास्तूशांती केली नाही. चमत्कार, कर्मकांड आशा भंपक गोष्टींना कोणतेही स्थान नव्हते भवानींची भक्ती म्हणजे लोककार्य हाच अर्थ होता. आशा राजमाता राष्ट्रमाता जिजाऊंचा मृत्यु १७ जून १६७४ रोजी रायगडाच्या पायथ्याशी 'पाचाड' या ठिकाणी झाला.

***शिवरायांच्या कर्तृत्वाची,***
***तूच शक्तीपीठ ।***
***तुच रचली माय जिजाऊ,***
***स्वराज्याची वीट ।।***
***जय जिजाऊ जय शिवराय***
***जय ज्योती जय भिमराय..!***

**- रामकिसन गुंडिबा मस्के**
अंबाजोगाई, जि.बीड

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

# महा रेशीम अभियान चित्ररथ जिल्ह्यात रवाना



बीड, (जिमाका):- जिल्हा रेशीम उद्योग कार्यालयामार्फत आयोजित महारेशीम अभियानाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी मोकाटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपाध्यक्ष शामसुंदर पडुळे, उपस्थित होते.

यावेळी रेशीम विभागाकडून तयार केलेल्या रथास निवासी उपजिल्हाधिकारी यांनी हिरवी झेंडी दाखवून रेशिम अभियानाची सुरुवात केली. हे अभियान ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ पर्यंत असून विभागाकडून गावोगावी कार्यक्रमाव्दारे रेशीम शेतीचे महत्व व अल्प पाण्यावर नगदी पीक असल्याने वर्षातुन ४ ते ५ पीके निघत असल्याने तसेच इतर पारंपारिक पिकापेक्षा जास्त उत्पन्न निघत असल्याचे शेतकरी वर्गात जनजागृती करुन करुन नोंदणी करण्यात येते. नोंदणी केलेल्या अल्पभुधारक शेतकऱ्यांना मनरेगा अंतर्गत ४,८,०००/- १०० टक्के अनुदान देण्यात येते. जे लाभार्थी मनरेगा अंतर्गत नाहीत बहुभुधारक यांना विभागाकडून सिल्क समग्र योजने अंतर्गत देण्यात येते.

राज्यात बीड जिल्हा रेशीम उत्पादनात प्रथम क्रमांकावर आहे जिल्हयात ५४०६ शेतकरी यामध्ये काम करत असून रेशीम उत्पादनामुळे उसतोड कामगार म्हणून ओळख असलेल्या या जिल्हयाची ओळख रेशीम उत्पादक जिल्हा म्हणून होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत विभागाकडून शासनमान्य कोष खोली बाजारपेठ उभारणी केली असून यामध्ये मोठया प्रमाणात कोष खरेदी (राज्यात प्रथम क्रमांकावर) केले जात आहे. सन २०२३-२४ मध्ये ११०९ मेट्रिक टन कोष शेतक-यांनी विक्री केले असून सन २०२४- २०२५ मध्ये १५ डिसेंबर २४ अखेर १०२२ मे. टन कोषाची खरेदी झाली असून सध्या कोषाचे सरासरी दर ५५०-६५० च्या प्रति क्विंटल असल्यने शेतक-यांचा कल रेशीम शेतीत वाढत चालला आहे. यावेळी रेशीम विकास अधिकारी एस.बी. वराट, ए.एम सोनटक्के, एस.आर. राठोड, एस.व्ही बावणे, एस.आर.पाटील, व्ही. एम मस्के, जी. एम शेळके, डी.बी. मिर्झा तसेच राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त शेतकरी शिवराज काटे, श्री. सपकाळ हे उपस्थित होते. या कालावधीत जास्तीत जास्त शेतक-यांनी रेशिम करिता नोंदणी करण्याचे आवाहन रेशीम विकास अधिकारी यांनी केले आहे. ***

# वेळेचे नियोजन व प्रयत्नांच्या पराकाष्ठेने उच्च ध्येयाची प्राप्ती - प्रा.डॉ.बोबडे



परळी वैजनाथ (बातमीदार):- आजच्या स्पर्धात्मक युगात शैक्षणिक गुणवत्ता साधण्यासाठी विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टी ठेवावी. त्याबरोबरच वेळेचे सुयोग्य नियोजन करून प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यास उच्च ध्येय गाठणे सहज शक्य होते, असे विचार अभ्यासक प्रा.डॉ.तुकाराम बोबडे यांनी मांडले.

येथील वैद्यनाथ महाविद्यालयात आज (दि.१७) बारावी वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभ व पुरस्कार वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ .श्री बोबडे बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. ए.आर. चव्हाण होत्या. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य सर्वश्री प्रा. डी. के. आंधळे, प्रा. डॉ. व्ही. गायकवाड, प्रा. एच.डी. मुंडे, नॅक समन्वयक डॉ.व्ही.जे. चव्हाण, पर्यवेक्षक प्रा. डॉ.नयनकुमार आचार्य, विज्ञानविभाग समन्वयक प्रा. आर. कांदे, प्रा. एम. एल. देशमुख यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या शुभहस्ते प्रारंभी दीप प्रज्वलन करून समारंभाचे उद्घाटन झाले.

यावेळी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात डॉ. श्री बोबडे यांनी विद्यार्थी जीवनाचे महत्त्व विशद करून यशाचे पैलतीर गाठण्यासाठी आवश्यक त्या बाबीवर सखोल मार्गदर्शन केले. ते म्हणाले की ज्ञानाची विविध क्षेत्रे तितकीच महत्त्वाची असून योग्य त्याची निवड करून त्यात मोठ्या परिश्रमाने यशाचे पैलतीर गाठावे. मनाला एकाग्र बनवून उत्साहाने अभ्यासात दक्ष रहावे. ध्येयनिश्चिती, मनाची एकाग्रता, आत्मविश्वास, अपूर्व कष्ट, वेळेचा सदुपयोग, परिस्थितीची जाणीव इत्यादी बाबी विद्यार्थ्यांनी सतत स्मरणात ठेवाव्यात. आळस किंवा प्रलोभन आले तर कधीही विचलित होता कामा नये. आई-वडिलांच्या उपकारांची जाणीव ठेवत नैतिक मूल्यांची जपणूक करावी. यामुळे निश्चितच सफलता प्राप्त होते. अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. ए. आर. चव्हाण यांनी ज्ञानात्मक कौशल्यांना केंद्रस्थानी ठेवून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक उद्दिष्टे साधतांना सर्वांगीण विकासावर भर देण्याचे आवाहन केले. यावेळी शैक्षणिक गुणवत्ता संपादित केलेल्या व विविध स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. वनरक्षक पोलीस कॉन्स्टेबल पदावर नुकत्याच नियुक्त झालेल्या कु. रागिनी मुंडे हिचा यावेळी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कु.तेजस्विनी साबळे, कु.साक्षी जाधव, कु. वैष्णवी गीते, गजानन फड, कु.साक्षी कराड ,कु. रागिनी मुंडे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. टी.आर. हुरगुळे यांनी करून दिला. प्रास्ताविक प्रा. यु. आर. कांदे यांनी केले. प्रा.डा.व्ही.एम.मुंडे, प्रा.एम. एल. देशमुख यांनीही यावेळी विचार मांडले. सूत्रसंचालन प्रा. आर. बी. शेटे व प्रा.यू. एल.कुरे यांनी केले, तर आभार प्रा.यु.आर.कांदे यांनी मानले. ***

# व्ही.के.कलर होम च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहरातील व्हीके कलर होम च्या दिनदर्शिकेचे भव्य प्रकाशन सोहळा संपन्न झाला असल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी शहरात एक अल्पावधीतच नावलौकिक केलेले व सामाजिक धार्मिक व शैक्षणिक कार्यात अग्रेसर असलेले व्ही.के कलर होम यांनी २०२५ चे कॅलेंडर दिनदर्शिका उत्तम प्रकारे काढण्यात आली असून तिचे प्रकाशन परळीचे माजी नगराध्यक्ष बाळासाहेब देशमुख, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे ज्येष्ठ नेते सोपानराव ताटे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष वैजनाथ सोळंके, वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बाळासाहेब जगतकर, माजी उपनगराध्यक्ष रवींद्र परदेशी, ओबीसी मराठवाडा नेते विनायक गडदे, अॅड. दिलीप उजगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार व्ही.के. कलर होमच्या वतीने विनोद कांबळे विनायक कांबळे, सावंत इत्यादी सह अनेकांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धाचार्य आनंद तुपसमुद्रे यांनी तर आभार विनायक कांबळे यांनी मानले.

# सूर्याचा देश अन् सुर्याची उर्जा..!



आपला देश हा सुर्यप्रकाशाचा देश आहे. युरोपातील समशितोष्ण वातावरणात सूर्य दर्शन ही पर्वणी ठरते मात्र आपल्याकडे काही पावसाचे दिवस वगळले तर इतर वेळी लख्ख सुर्यप्रकाश असतो आणि याचाच वापर करुन उर्जा निर्मितीला गती देण्यात आली. ज्यात होणारा प्रारंभिक खर्च अधिक असला तरी यात दीर्घकालीन फायदा आणि शाश्वत विकास हा खूप मोठा फायदा आहे. सोबतच निसर्ग संवर्धनातुन लागणारा हातभार वेगळा.

कार्बन उत्सर्जन आणि त्याचे धोके आपणा सर्वांना माहिती आहे. औद्योगिकरणाची गरज म्हणून सर्वाच ठिकाणी ऊर्जा निर्मितीसाठी जिवाश्म अर्थात कोळशावर आधारित वीज निर्मिती प्रकल्प उभे राहिले. सातत्याने कार्बन उत्सर्जन करणाऱ्या या प्रकल्पांनी निसर्गाचे चक्र बिघडविले आहे. ऋतू मर्यादा ओलांडणे, अतिवृष्टी, महापूर आदी संकटे यामुळेच सुरु झाली. जागतिक स्तरावर कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत आणि आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट म्हणजे आपण यात गतीने नाटचाल करीत आहोत.

निसर्गाला वेठीस धरून त्याच्या साधन सुविधांचा गैरवापर टाळावा आणि आपल्या भागात असलेल्या सर्व जमेच्या बाजू एकत्र करून विकास साधावा याचा वस्तुपाठ आपण या निमित्त जगापुढे मांडत आहोत.

हिमालय आणि उत्तरेचा काही राज्यांचा भाग वगळता देशात सर्वत्र सूर्यप्रकाश मुबलक प्रमाणात आहे याचा वापर करून सौर ऊर्जा निर्मिती करणे सुरू झाल्याने आपला जिवाश्म इंधनाचा वापर हळूहळू कमी करण्याचा प्रयत्न आहे. केवळ सौर ऊर्जाच नव्हे तर इतरही ग्रीन एनर्जी पर्याय हाताळले जात आहेत. केवळ सौर ऊर्जेचा विचार केला तर देशाने यात खूप मोठा टप्पा गाठला आहे असे म्हणता येईल. यात आपण प्रतिवर्षे २०० टक्क्याहून अधिक गतीने पुढे जात आहोत जून २०२४ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार देशात ८७.२ गिगा वॅट सौर ऊर्जेचे उद्दीष्ट आपण गाठले आहे.

देशाचे अपारंपरिक उर्जा/पर्यायी ऊर्जा निर्मितीचे २०३० चे एकुण उद्दीष्ट ५०० गिगावॅट इतके आहे यातील निम्म्याहून अधिक ऊर्जा अर्थात ३०० गिगा वॅट ऊर्जा निर्मिती सौर ऊर्जा असावी असे अपेक्षित आहे.

देशामध्ये ज्यावर शेती शक्य नाही अशा जागांव सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांची उभारणी करण्याचा निर्णय पहिला टप्यात घेण्यात आलेला आहे. यासोबतच विजेचा वापर करणारा व स्वतचे घर असणारा देशातील प्रत्येक नागरिक या सौर उर्जा निर्मितीमध्ये स्वत:चा खारीचा वाटा उचलण्यास सक्षम आहे.

नागरिकांनी आपापल्या घरावर ३ किलो वॅट ते ५ किलो वॅट चे सौरउर्जा निर्मिती उदीष्ट ठेवावे आणि याला बॅंक कर्जा सोबत ७६ हजारापर्यंत अनुदान अशी जोड देण्यात आली आहे. अशा पध्दतीने उर्जा निर्माण करुन ती वीज करुन ती वीज निर्मिती कंपनीला पाठवायची आहे. घरात कंपनीची वापरलेली वीज आणि आपण केलेली निर्मिती यातील फरक केवळ वीज देयक स्वरुपात कंपनीला द्यायचा अशी ही सौर उर्जा योजना आहे आणि याच्या दिर्घकालीन वित्तीय लाभाच्या गणितामुळे आता चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

नागरिकांनी स्वत:च्या घराच्या छतावर उर्जा निर्मितीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे आणि अशी उर्जा उद्योग- शेतीकडे वळविता आल्यास विकासाची गती वाढणार हे नक्की आहे. निसर्ग समतोल आणि आर्थिक स्तरावर सुवर्णमध्ये साधणारी सौर उर्जा निर्मिती यासाठी देशाला आवश्यक आहे.

**- प्रशांत विजया अनंत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी
बीड